प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA

संचार विभाग, केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
ई-मेल email: helpdoc@rbi.org.in

ऑक्टोबर 10, 2017

**नीड्स ऑफ लाईफ कोऑपरेटिव बँक लि. मुंबई ह्यांना आरबीआयकडून आर्थिक दंड लागु**

बँकिंग विनियामक अधिनियम 1949 च्या (सहकारी सोसायट्यांना लागु असलेला) कलम 46 (4) सह वाचित कलम 47 अ (1) (ब) ने तिला दिलेल्या अधिकारांचा वापर करुन, भारतीय रिझर्व बँकेने, दि नीड्स ऑफ लाईफ कोऑपरेटिव बँक लि., फोर्ट, मुंबई ह्यांना रु.5.00 लाख (रुपये पाच लाख) दंड लागु केला असून, हा दंड, संचालक व त्यांच्या नातेवाईकांना दिलेली कर्जे व अग्रिम राशी ह्यावरील आरबीआयने दिलेल्या मार्गदर्शक तत्वांचे/निदेशांचे उल्लंघन केल्यामुळे, तसेच अप्रतिभूतित ओव्हरड्राफ्ट सुविधा देऊन संस्थांमध्ये असलेले हितसंबंध, वरील बँकेने दिलेली देणगी, भरणा भांडवलाच्या 5% ह्या वैय्यक्तिक भागधारणाचा भंग केल्याबाबत, रियल इस्टेट, कमर्शियल रियल इस्टेट व गृहनिर्माण कर्ज ह्याबाबतच्या एक्सपोझर मर्यादांचा भंग केल्याबाबत, 10% ह्या आऊटस्टँडिंग अप्रतिभूतित एक्सपोझर मर्यादेचा भंग, रु.2.00 लाख ह्या वैय्यक्तिक अप्रतिभूतित एक्सपोझरचा केलेला भंग, आणि ठेवीदार शिक्षण व जाणीव निधीमध्ये निधी जमा न केल्याबाबत करण्यात आला आहे.

भारतीय रिझर्व बँकेने वरील बँकेला एक कारणे दाखवा नोटिस पाठविली होती व त्यावर वरील बँकेने लेखी उत्तर सादर केले होते. सप्टेंबर 4, 2017 रोजीच्या वैय्यक्तिक सुनावणीस वरील बँक हजर राहिली नाही. ह्या प्रकरणातील सत्य व बँकेने दिलेले उत्तर विचारात घेऊन रिझर्व बँकेने निष्कर्ष काढला की उल्लंघने झाली असून त्यासाठी दंड लावणे आवश्यक आहे.

**अजित प्रसाद**

सहाय्यक सल्लागार

**वृत्तपत्र निवेदन : 2017-2018/981**